दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार, दि. २८ जानेवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १२५ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सुविचार

मैत्री म्हणजे वेळेची गरज नसताना दिलेला साथ, अडचणीत शब्द नकोसे ठरवणारा आधार, आनंदात मनापासून हसणारा आणि दुःखात शांतपणे सोबत उभा राहणारा विश्वासाचा नातेसंबंध.

## ...तर पाठिंबा काढू!

**परभणी** : चंद्रपुरात मदत न केल्यास परभणीत पाठिंबा काढू, अशी थेट भूमिका काँग्रेसनं घेतल्याचं वृत्त आहे. चंद्रपुरात सत्ता स्थापनेचा पेच कायम आहे. चंद्रपुरात सत्ता स्थापनेसाठी ३४ चा आकडा गाठणं गरजेचं आहे. काँग्रेसनं सर्वाधिक २७ जागा जिंकल्या आहेत. पण काँग्रेसमध्ये गटातटाचं राजकारण सुरु आहे. भाजपला २३ जागांवर यश मिळालं आहे. ठाकरेसेनेनं ६ जागा जिंकल्या आहेत. सत्ता स्थापनेसाठी काँग्रेसला ठाकरेसेनेचा पाठिंबा गरजेचा आहे.

## सारांश वृत्त

### गँगस्टर गोल्डी ब्रारच्या पालकांना अटक

**चंदीगड :** २०२४ च्या खंडणी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या परदेशी गुंड गोल्डी ब्रारच्या पालकांना मंगळवारी तीन दिवसांच्या पोलिस कोठडीत पाठवण्यात आले, असे पोलिसांनी सांगितले. पंजाबमध्ये गुंड आणि त्यांच्या सहकाऱ्यांविरुद्ध सुरू असलेल्या पोलिस कारवाईदरम्यान ब्रारचे वडील शमशेर सिंग आणि त्यांची आई प्रीतपाल कौर यांना अमृतसर येथून अटक करण्यात आली आणि सोमवारी त्यांना एक दिवसाची पोलिस कोठडी देण्यात आली. पोलिस तपासानुसार, ब्रारचे पालक त्यांच्या मुलाला खंडणीच्या कामांमध्ये मदत करत होते आणि प्रोत्साहन देत होते असा आरोप आहे.

### नेपाळमधून फरार आरोपीला अटक

**अहमदाबाद :** ड्रग्जच्या आरोपाखाली नेपाळी तुरुंगातून पळून गेलेल्या अहमदाबादच्या एका रहिवासीला गुजरात पोलिसांनी अटक केली, असे अधिकाऱ्यांनी मंगळवारी सांगितले. तांत्रिक पाळत ठेवणे आणि मानवी बुद्धिमत्तेचा समावेश असलेल्या समन्वित प्रयत्नांनंतर गुन्हे शाखेच्या विशेष ऑपरेशन्स ग्रुपने आरोपी धर्मेश चुनारा याचा माग काढला. ठक्करबापा नगर रोड येथील रहिवासी चुनारा, गेल्या वर्षी नागरी अशांततेमुळे झालेल्या हिंसक तुरुंग पलायनाच्या वेळी काठमांडूच्या भद्रा तुरुंगातून पळून गेल्यापासून फरार होता.

### बँक कर्मचाऱ्यांचा संप कामकाजावर परिणाम

**नवी दिल्ली :** मंगळवारी देशातील अनेक ठिकाणी चेक क्लिअरन्स, रोख रक्कम जमा करणे आणि काढणे यासारख्या शाखा बँकिंग कामकाजावर परिणाम झाला कारण युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सने पाच दिवसांचा कामाचा आठवडा त्वरित लागू करण्याच्या मागणीसाठी देशव्यापी संप पाळला. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे सुमारे ८ लाख कर्मचारी यात सहभागी झाले होते.

## १८ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर भारत–युरोपीय संघ

# मुक्त व्यापार करारावर अखेर शिक्कामोर्तब

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारत आणि युरोपीय संघ यांच्यात तब्बल १८ वर्षांनंतर मुक्त व्यापार करारावर (एफटीए) शिक्कामोर्तब झाले आहे. मंगळवारी पार पडलेल्या १६व्या भारत–युरोपीय संघ शिखर परिषदेत या कराराची अधिकृत घोषणा करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कराराचे वर्णन 'सर्व करारांची जननी' (मदर ऑफ ऑल डील्स) असे केले असून, जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर हा करार दोन्ही बाजूंना धोरणात्मक संरक्षण देणारा ठरेल, असे मत व्यक्त करण्यात आले.



हा करार जागतिक सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या सुमारे २५ टक्के आणि जागतिक व्यापाराच्या जवळपास एकतृतीयांश भागाचे प्रतिनिधित्व करतो. त्यामुळे भारत–युरोपीय संघ आर्थिक भागीदारीला नवे परिमाण मिळणार आहे. कापड, रत्न-दागिने, अभियांत्रिकी वस्तू, औषधनिर्मिती, आयटी सेवा आणि उत्पादन क्षेत्राला या कराराचा मोठा लाभ होण्याची शक्यता आहे.

पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की, या करारामुळे भारतातील उत्पादन आणि सेवा क्षेत्राला चालना मिळेल, रोजगारनिर्मिती वाढेल आणि जागतिक गुंतवणूकदारांचा भारतावरील विश्वास अधिक दृढ होईल. तसेच जागतिक पुरवठा साखळी मजबूत करण्यास हा करार महत्त्वाचा ठरेल.

युरोपीय संघाच्या वतीने युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला व्हॉन डर लेयेन यांनी या कराराला ऐतिहासिक महत्त्वाचे संबोधले. भारत आणि युरोपीय संघ यांच्यातील सहकार्य केवळ व्यापारापुरते मर्यादित न राहता धोरणात्मक, तांत्रिक आणि भू-राजकीय पातळीवरही अधिक बळकट होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

२००७ पासून या करारावर चर्चा सुरू होती. अनेक अडथळे आणि मतभेदांनंतर अखेर दोन्ही बाजूंनी तडजोड करत करार अंतिम करण्यात आला. पुढील टप्प्यात कराराच्या अंमलबजावणीसाठी कायदेशीर प्रक्रिया आणि संबंधित संसदीय मान्यतांची पूर्तता केली जाणार आहे. जागतिक स्तरावर वाढत असलेले संरक्षणवादाचे धोरण, व्यापार संघर्ष आणि आर्थिक अनिश्चिततेच्या काळात भारत–युरोपीय संघ मुक्त व्यापार कराराला महत्त्वाचे धोरणात्मक पाऊल मानले जात आहे.

## राज्यात ३.३७ लाख मेट्रिक टन तूर खरेदीला केंद्राची मान्यता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : महाराष्ट्रातील तूर उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी केंद्र सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, राज्यात ३.३७ लाख मेट्रिक टन तूर खरेदीस केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. अशी माहिती राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यासोबत पणन मंत्री जयकुमार रावल यांची उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. याचा थेट लाभ राज्यातील लाखो तूर उत्पादक शेतकऱ्यांना होणार आहे.

मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले की, सन २०२५-२६ या हंगामासाठी महाराष्ट्रातील तूर उत्पादक शेतकऱ्यांकडून ३.३७ लाख मेट्रिक टन तूर खरेदीस केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. तुरीची खरेदी ८,००० रुपये प्रति क्विंटल या किमान हमीभावाने केली जाणार आहे. या खरेदीसाठी २० जानेवारी २०२६ पासून नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत नोंदणी सुरू राहणार आहे.

ही खरेदी प्रक्रिया नाफेड आणि एनसीसीएफ या केंद्रीय संस्थांमार्फत राज्य सरकारच्या समन्वयाने राबविण्यात येणार असून, त्यासाठी राज्यभरात ९३४ खरेदी केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत.

यावर्षी राज्यातील तूर उत्पादनाचा अंदाज १३.५१ लाख मेट्रिक टन इतका आहे. तसेच मागील हंगामात राज्यातील ८५ हजार शेतकऱ्यांकडून १३ लाख ३३ हजार १२८ क्विंटल तूर खरेदी करण्यात आली होती, अशी माहितीही मंत्री रावल यांनी दिली.

## चौकशी समितीच्या अहवालाकडे केंद्राचे लक्ष

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्याविरुद्ध सुरू असलेल्या महाभियोग प्रक्रियेबाबत सरकार लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी स्थापन केलेल्या तीन सदस्यीय चौकशी समितीच्या अहवालाची वाट पाहत असल्याचे संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी मंगळवारी स्पष्ट केले.

न्यायमूर्ती वर्मा यांना पदावरून हटवण्यासाठी बहुपक्षीय नोटीस दाखल झाल्यानंतर, १२ ऑगस्ट रोजी अध्यक्ष बिर्ला यांनी भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी समिती नेमली होती.

१४ मार्च रोजी दिल्लीतील त्यांच्या सरकारी निवासस्थानी जळालेल्या नोटांचे तुकडे आढळल्यानंतर त्यांची दिल्ली उच्च न्यायालयातून अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्यात आली होती.

आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी हा मुद्दा उपस्थित केला जाईल का, या प्रश्नावर रिजिजू यांनी भाष्य टाळले. "प्रक्रियेनुसार प्रकरण समितीकडे सोपवले आहे. समिती आपले काम करत आहे आणि आम्ही तिच्या अहवालाची प्रतीक्षा करीत आहोत. त्याआधी टिप्पणी करणे उचित नाही," असे ते म्हणाले.

या चौकशी समितीत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश अरविंद कुमार, मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश मनिंद्र मोहन श्रीवास्तव आणि कर्नाटक उच्च न्यायालयाचे ज्येष्ठ वकील बी. व्ही. आचार्य यांचा समावेश आहे.

## महाकालेश्वर मंदिरातील दर्शनावरून न्यायालयाने सुनावले

# व्हीआयपी कोण हे जिल्हाधिकाऱ्यांनी ठरवावे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर** : उज्जैन येथील श्री महाकालेश्वर मंदिरातील गर्भगृहात 'व्हीआयपी दर्शन' देण्याच्या प्रथेला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. आर. महादेवन आणि न्या. जॉयमल्या बागची यांच्या खंडपीठासमोर दर्पण अवस्थी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी झाली. जिल्हाधिकारी आणि व्यवस्थापन समितीच्या प्रशासकांच्या परवानगीने व्हीआयपींना गर्भगृहात प्रवेश दिला जाऊ शकतो. कोणाला 'व्हीआयपी' मानायचे, हा निर्णय जिल्हाधिकारी व प्रशासकांचा असून तो न्यायालयीन



पुनरावलोकनाच्या कक्षेत येत नाही, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याची याचिका फेटाळल्याच्या निर्णयाला अवस्थी यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मंदिराच्या गर्भगृहात पाणी अर्पण करण्यासाठी व्हीआयपींना प्राधान्य दिले जाते, तर सामान्य भाविकांना त्यापासून वंचित ठेवले जाते, असा याचिकाकर्त्याचा दावा होता. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. विष्णू शंकर जैन यांनी युक्तिवाद करताना सांगितले की, गर्भगृहात प्रवेशाबाबत एकसमान धोरण असले पाहिजे. ही बाब संविधानाच्या अनुच्छेद १४ चे उल्लंघन आहे. व्हीआयपी दर्जाच्या आधारावर नागरिकांमध्ये भेदभाव करता येणार नाही. एखाद्या व्यक्तीला जिल्हाधिका-यांच्या शिफारशीवर गर्भगृहात प्रवेश दिला जात असेल, तर सामान्य भाविकालाही महाकालाचे दर्शन घेऊन पाणी अर्पण करण्याचा अधिकार असला पाहिजे असे त्यांनी मांडले. सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्ट केले की, गर्भगृहात कोणाला प्रवेश द्यावा किंवा देऊ नये, हा निर्णय न्यायालयाचा विषय नाही. हा प्रश्न न्यायालयीन हस्तक्षेपाच्या कक्षेत येत नाही. अशा बाबींवर निर्णय घेण्याची जबाबदारी संबंधित प्राधिकरणांची आहे. न्यायालयांनी जर अशा प्रकारचे नियमन सुरू केले, तर ते अतिरेकी ठरेल असे निरीक्षण त्यांनी नोंदवले. गर्भगृहात अनुच्छेद १४ लागू केला, तर अनुच्छेद १९ सारखे इतर मूलभूत हक्कही लागू करण्याची मागणी होऊ शकते, असेही सरन्यायाधीशांनी नमूद केले. आज प्रवेशाचा हक्क मागितला जाईल, उद्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यांच्या आधारे मंत्रोच्चार करण्याचा हक्कही मागितला जाईल. अशा परिस्थितीत सर्व मूलभूत हक्क गर्भगृहात लागू होतील असे त्यांनी सांगितले. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी पुन्हा भेदभावाचा मुद्दा उपस्थित करत, किंवा सर्वांसाठी पूर्ण बंदी असावी किंवा सर्वांसाठी समान प्रवेश असावा. निवडक आणि प्राधान्याच्या आधारावर परवानगी देणे अयोग्य आहे असा युक्तिवाद केला. मात्र न्यायालय हस्तक्षेप करण्यास तयार नसल्याने याचिका मागे घेण्यात आली.

## जि.प. निवडणुकानंतर सातारा गॅझेट लागू होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यात मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा शासन निर्णय घेण्यात आला. त्यामुळे, हैदराबाद गॅझेटियरच्या निर्णयानुसार मराठवाड्यातील अनेक मराठा बांधवांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ मिळण्यासही सुरुवात झाली आहे. त्यामुळे, हैदराबाद गॅझेटियर लागू झाले पण सातारा गॅझेटियर कधी लागू होणार? असा प्रश्न मराठा बांधवांना पडला आहे. मराठा आरक्षण उपसमितीची आज मंत्रालयात बैठक संपन्न झाली, उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वात या बैठकीत सातारा गॅझेटियरवर प्रामुख्याने चर्चा झाली.जिल्हा परिषद निवडणुकीनंतर यावर निर्णय होण्याची शक्यता आहे.



सातारा गॅझेटियरचा लाभ साताऱ्यासह पश्चिम महाराष्ट्रातील मराठा बांधवांना होणार असल्याने या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तसेच, हैदराबाद गॅझेटियर अंमलबजावणी आणि मराठा आरक्षण विषयावर आढावा घेण्यात आला. त्यानुसार, राज्यातील जिल्हा परिषद निवडणुकांनंतर सातारा गॅझेटियर लागू करण्यात येणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.जिल्हा परिषद निवडणुकीनंतर सातारा गॅझेट लागू करण्यासंदर्भात निर्णय होण्याची शक्यता असल्याची सूत्रांची माहिती आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमुळे सातारा गॅझेट लागू करण्यास अडचणी येत आहेत. अशातच, फक्त इंटरप्रिटेशनचा भाग असल्याने यासंदर्भात देखील लवकरच निर्णय होणार असून समज-गैरसमज दूर करत मराठा आरक्षणासंदर्भात सातारा गॅझेट लागू करण्यासंदर्भात हालचाली सुरू झाल्या आहेत.

राज्यात गेल्या काही महिन्यांपासून निवडणुकाची रणधुमाळी पाहायला मिळत आहे. आधी नगरपालिका निवडणुका, पुन्हा महापालिका आणि आता जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्रातील जवळपास सर्वच जिल्ह्यात आचारसंहिता लागू असल्याने राज्य सरकारला काही महत्त्वाचे निर्णय किंवा नागरिकांना थेट लाभ होईल, असे निर्णय घेतात येत नाहीत.

## सोनियांच्या बैठकीला शशी थरूर यांची दांडी


**नवी दिल्ली** : केरळ विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजण्यापूर्वीच काँग्रेसमध्ये अंतर्गत मतभेदांची नवी ठिणगी पडल्याचे चित्र आहे. सोनिया गांधी यांनी बोलावलेल्या पक्षनेत्यांच्या महत्त्वपूर्ण बैठकीला ज्येष्ठ नेते आणि खासदार शशी थरूर अनुपस्थित राहिल्याने, पक्षात पुन्हा एकदा 'नाराजी नाट्य' सुरू झाल्याची चर्चा रंगली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात सरकारला घेरण्यासाठी रणनीती आखण्याकरिता सोनिया गांधी यांच्या निवासस्थानी ही बैठक पार पडली. या बैठकीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी, पी. चिदंबरम, मनीष तिवारी आणि प्रमोद तिवारी यांसारखे दिग्गज नेते उपस्थित होते.

## मुंबईत भाजप-शिंदेसेना एकत्र?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : मुंबई महापालिकेत स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर भाजप आणि शिंदेसेना आता सत्ता अधिक मजबूत करण्याच्या दिशेने पुढचे पाऊल टाकत आहेत. महापालिकेत स्वतंत्र गट नोंदणीऐवजी दोन्ही पक्षांची एकत्र गटनिर्मिती करण्याचा प्रस्ताव पुढे आला असून, त्याद्वारे स्थायी समितीत संख्याबळ भक्कम करण्याचा डाव आखण्यात आला आहे.

निवडणुकीनंतर शिंदेसेना स्वतंत्र गट म्हणून नोंदणी करेल, अशी चर्चा होती. मात्र सत्तास्थापनेच्या प्रक्रियेत अनपेक्षित वळण आले आहे. भाजपकडून शिंदेसेनेला एकत्र गट नोंदणीचा प्रस्ताव देण्यात आला असून, त्यात गटनेतेपद भाजपकडे तर प्रतोदपद शिंदेसेनेकडे देण्याची मांडणी करण्यात आली आहे. या प्रस्तावावर शिंदेसेना कोणती भूमिका घेते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



महापालिकेत भाजपचे ८९ तर शिंदेसेनेचे २९ नगरसेवक आहेत. या संख्येनुसार स्थायी समितीत भाजपचे १० आणि शिंदेसेनेचे ३ सदस्य होतात. स्वतंत्र गटनिर्मिती झाल्यास दोन्ही पक्षांचे एकत्र संख्याबळ १३ इतकेच राहील. २६ सदस्यीय स्थायी समितीत ही संख्या निर्णायक ठरण्यास अपुरी ठरू शकते. त्यामुळेच एकत्र गट नोंदणी करून बहुमत निश्चित करण्यावर भर दिला जात आहे. स्थायी समिती ही मुंबई महापालिकेची आर्थिक सूत्रे हाताळणारी महत्त्वाची यंत्रणा आहे. सुमारे ७४ हजार कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पावर तिचे नियंत्रण असते. त्यामुळे या समितीत स्पष्ट बहुमत मिळवणे भाजपसाठी अत्यावश्यक मानले जात आहे.

दरम्यान, शिंदेसेनेकडून स्वतंत्र गट नोंदणीचा कार्यक्रम नवी मुंबईतील कोकण भवनात ठरवण्यात आला होता. नगरसेवकांसाठी बसची व्यवस्थाही करण्यात आली होती. मात्र ऐनवेळी हा कार्यक्रम रद्द करण्यात आला. विशेष म्हणजे शिंदेसेनेने गट नोंदणीचा कार्यक्रम सलग दुसऱ्यांदा रद्द केल्याने राजकीय चर्चांना अधिकच उधाण आले आहे.

## कार, वाइन आणि यंत्रसामग्रीवरील शुल्कात ऐतिहासिक कपात

# भारत-युरोपियन महासंघात मुक्त व्यापार करार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारत आणि युरोपियन युनियनने सोमवारी ऐतिहासिक मुक्त व्यापार करारावर वाटाघाटी पूर्ण केल्या. त्यानंतर भारताने कारवरील कर ११०% वरून १०% पर्यंत, वाइनवरील कर १५०% वरून निम्मे आणि यंत्रसामग्रीवरील ४४% पर्यंतचे शुल्क रद्द करणे निश्चित केले, ज्यामुळे द्विपक्षीय व्यापारात महत्त्वाचा वाढ अपेक्षित आहे. या करारानुसार, भारत आपल्या काही उच्च आयात शुल्कात मोठ्या प्रमाणावर कपात करणार आहे. यामध्ये विशेषतः कार, वाइन आणि औद्योगिक यंत्रसामग्री



यांचा समावेश आहे.

युरोपियन कमिशनच्या प्रेस स्टेटमेंटनुसार, हा करार भारतासाठी सर्वात महत्त्वाकांक्षी व्यापार संधी आहे, ज्यामुळे जगातील दुसऱ्या आणि चौथ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थांमधील द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणूक लक्षणीयरीत्या वाढण्याची अपेक्षा आहे. जागतिक भू-राजकीय तणाव आणि अर्थव्यवस्था अनिश्चिततेच्या काळात हा करार नियम-आधारित व्यापारासाठी सामायिक वचनबद्धता अधोरेखित करतो.

करारानुसार भारत युरोपियन युनियनच्या ९६.६% वस्तूंच्या निर्यातीवरील शुल्क कमी किंवा रद्द करेल. युरोपी महासंघाच्या अंदाजानुसार, २०३२ पर्यंत भारताला होणारी वस्तूंची निर्यात दुप्पट होईल, आणि युरोपियन कंपन्यांना दरवर्षी सुमारे ४ अब्ज युरोची बचत होईल. या बदलांबरोबर कठोर आरोग्य, सुरक्षा आणि नियामक मानके कायम राहतील, ज्यामुळे भारतीय निर्यातदारांना युरोपच्या बाजारपेठेत प्रवेश अधिक खुले राहील. सर्वात लक्षवेधी बदल ऑटोमोबाईल क्षेत्रात आहेत. सध्या आयात केलेल्या युरोपियन कारवरील कर ११०% आहे, जो कोटा-आधारित प्रणालीने हळूहळू १०% पर्यंत कमी केला जाईल. कारच्या सुटे भागांवरील कर पाच ते दहा वर्षांत पूर्णपणे रद्द केला जाईल. यामुळे भारताच्या संरक्षित कार बाजारात बदल होईल आणि युरोपियन वाहन उत्पादकांसाठी स्पर्धात्मक धार निर्माण होईल.

औद्योगिक वस्तूंमध्ये यंत्रसामग्रीवरील ४४%, रसायनांवरील २२% आणि औषधांवरील ११% पर्यंतचे शुल्क टप्प्याटप्प्याने कमी केले जाईल. कृषी आणि अन्न उत्पादनांमध्येही मोठी कपात केली जाईल. वाइनवरील शुल्क १५०% वरून ७५% पर्यंत कमी होईल आणि नंतर हळूहळू २०% पर्यंत आणखी कमी केले जाईल. ऑलिव्ह ऑइलवरील शुल्क पाच वर्षांत ४५% वरून शून्यावर येईल. संवेदनशील क्षेत्रांमध्ये गोमांस, पोल्ट्री, तांदूळ आणि साखर यांचा समावेश नाही.

वस्तूंव्यतिरिक्त, करार भारताची सेवा क्षेत्राची बाजारपेठ युरोपीय कंपन्यांसाठी खुली करतो, विशेषतः वित्तीय सेवा आणि सागरी वाहतुकीमध्ये. बौद्धिक संपदा हक्कांसाठी मजबूत संरक्षण दिले आहे, तसेच व्यापार, शाश्वत विकास, हवामान कृती, पर्यावरण संरक्षण आणि कामगार मानके यांचा समावेश असलेले प्रकरणही आहे.


युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांनी या कराराला "ऐतिहासिक" म्हटले असून, यामुळे जवळजवळ २ अब्ज लोकसंख्येला व्यापणारा मुक्त व्यापार क्षेत्र तयार होईल असे सांगितले.

## आव्हाडांचे शक्तीप्रदर्शन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ठाणे** : एमआयएमच्या नगरसेविका सहर शेख यांनी दिलेल्या आव्हानानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे आमदार जितेंद्र आव्हाड मंगळवारी प्रथमच मुंब्र्यात दाखल झाले. त्यांच्या सत्कारानिमित्त आयोजित कार्यक्रमात मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते जमले होते. जोरदार घोषणाबाजी आणि शक्तीप्रदर्शनामुळे परिसरात राजकीय वातावरण तापले होते.

कार्यक्रमस्थळी येताना कार्यकर्त्यांनी 'कोण आया रे कोण आया, शेर का शिकारी आया' अशा घोषणा दिल्या. याबाबत विचारले असता, आव्हाड यांनी या घोषणा आजकाल गल्लोगल्ली ऐकू येतात, असे सांगत तरुण कार्यकर्त्यांच्या कल्पकतेकडे लक्ष वेधले. "ही पोरांची कल्पक घोषणा आहे, त्याचा



अर्थ तुम्हीच लावा," असे ते म्हणाले.

सहर शेख यांच्या आव्हानावर प्रतिक्रिया देताना आव्हाड यांनी स्पष्ट शब्दांत भूमिका मांडली. "मला काही सांगायचं नाही. आव्हान देणं हे काही लोकांचं काम असतं. आम्ही आमच्या मार्गाने काम करतो. 'हाथी चले अपनी चाल, कुत्ते भोंके हजार'— त्याचा आम्हाला काहीही फरक पडत नाही," असे त्यांनी सांगितले.

सहर शेख यांच्या वक्तव्यांवर टीका करताना आव्हाड म्हणाले की, अशा विधानांना सोशल मीडियावर विनाकारण प्रसिद्धी मिळते. "मुंब्रा तिरंगा आहे, महाराष्ट्र तिरंगा आहे. संविधानाने तिरंगा दिला आहे; एकाच रंगाची मक्तेदारी चालू शकत नाही," असेही त्यांनी स्पष्ट केले.

# संपादकीय

## समतेच्या नावाखाली वाढलेली अस्वस्थता

**उच्च शिक्षणात जातिभेद रोखण्याच्या उद्देशाने आणलेल्या नव्या नियमांमुळे देशभरात तीव्र वाद उभा राहिला आहे. सामाजिक न्याय आणि घटनात्मक समता यांचा समतोल साधताना धोरणांची रचना कशी असावी, हा मूलभूत प्रश्न या निमित्ताने पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.**




भारतीय उच्च शिक्षणाच्या पटावर सध्या एक नवा संघर्ष उभा राहिला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने जाहीर केलेल्या नव्या समता नियमनांमुळे हा संघर्ष केवळ शैक्षणिक वर्तुळापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो सामाजिक न्याय, घटनात्मक समता आणि राजकीय संतुलन या साऱ्या मुद्द्यांना स्पर्श करणारा ठरला आहे. जातिभेद रोखण्याच्या नावाखाली आणलेल्या या नियमांनी समाजातील जुने प्रश्न मिटवण्याऐवजी नवे प्रश्न उभे केले आहेत, अशी भावना मोठ्या प्रमाणावर व्यक्त होत आहे. या नियमनांचा घोषित उद्देश सरळ आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, दिव्यांग आणि सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांना उच्च शिक्षण संस्थांमध्ये भेदभावाला सामोरे जावे लागू नये. त्यासाठी प्रत्येक विद्यापीठ व महाविद्यालयात समता समित्या, समान संधी केंद्रे आणि तक्रार निवारण यंत्रणा सक्तीच्या करण्यात आल्या आहेत. कागदावर पाहता हा प्रयत्न स्वागतार्ह वाटतो. भारतीय समाजात जातिभेदाचा इतिहास खोलवर रुजलेला आहे आणि शिक्षण क्षेत्र त्यापासून पूर्णपणे मुक्त आहे, असे ठामपणे म्हणता येत नाही. मात्र, समस्या उद्देशात नाही; समस्या रचनेत आणि अंमलबजावणीत आहे. नव्या नियमनांमध्ये भेदभावाची व्याख्या अत्यंत व्यापक ठेवण्यात आली आहे. त्यामुळे एखाद्या शैक्षणिक निर्णयालाही जातीय अन्यायाचे स्वरूप दिले जाऊ शकते, अशी भीती व्यक्त केली जाते. अधिक गंभीर बाब म्हणजे या यंत्रणांमध्ये सर्व घटकांचे प्रतिनिधित्व आणि संरक्षण याबाबत स्पष्टता दिसून येत नाही. काही वर्गांना तक्रारदार म्हणून ओळख दिली जाते, पण इतर वर्गांबाबत मौन पाळले जाते. या मौनातूनच असंतोष जन्माला येतो. याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे आंदोलन, शिक्षकांची चिंता आणि राजकीय प्रतिक्रिया समोर आली. राजधानीत झालेली आंदोलने ही केवळ नियमांविरोधातील नव्हती, तर ती ऐकून न घेण्याच्या वृत्तीविरोधातील होती. नियम तयार करताना व्यापक सल्लामसलत झाली का, संबंधित घटकांना विश्वासात घेतले गेले का, असे प्रश्न उपस्थित झाले. शिक्षण व्यवस्थेतील कोणताही बदल हा थेट लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी निगडित असतो; त्यामुळे तो घाईघाईने लादला जातो, तेव्हा संशय निर्माण होतो. या वादाला राजकीय किनारही लाभली आहे. हे नियम सामाजिक सलोखा वाढवण्याऐवजी वर्गीय दुरावा वाढवू शकतात. शिक्षण हे समता निर्माण करण्याचे साधन असावे, नवे संशय आणि भीती पसरवण्याचे नव्हे, अशी भूमिका मांडली जाते. या साऱ्या घडामोडी अखेर सर्वोच्च न्यायालयाच्या दारात पोहोचल्या आहेत. दाखल झालेल्या याचिकांमधून मूलभूत प्रश्न उपस्थित केला जातो तो असा की, समतेच्या नावाखाली आणलेली व्यवस्था खरोखरच सर्वांसाठी समताधिष्ठित आहे का. घटनात्मक समानतेचा अर्थ फक्त काही गटांचे संरक्षण एवढाच मर्यादित नसतो; तो सर्व नागरिकांना समान न्याय देण्याचा असतो. जर एखादी व्यवस्था काहींना आधीच दोषी ठरवण्याची भावना निर्माण करत असेल, तर ती समतेच्या तत्त्वाशी विसंगत ठरते. अनेक विद्यार्थ्यांना मानसिक छळ, उपेक्षा आणि संस्थात्मक भेदभाव सहन करावा लागतो. अशा परिस्थितीत कठोर आणि स्पष्ट नियमांशिवाय बदल घडणार नाही, असा त्यांचा युक्तिवाद आहे. काहींच्या मते, विरोध हा प्रामुख्याने अस्वस्थतेतून आलेला आहे, कारण जुन्या सत्तासमीकरणांना आव्हान मिळत आहे. या दोन टोकांच्या भूमिकांमधून एक महत्त्वाचा मुद्दा पुढे येतो. सामाजिक न्याय आणि प्रक्रियात्मक न्याय यांचा समतोल साधणे ही खरी कसोटी आहे. उद्दिष्ट योग्य असले तरी साधने अन्यायकारक ठरली, तर परिणाम उलट होऊ शकतो. शिक्षण संस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले, तर मुक्त विचार, प्रश्न विचारण्याची सवय आणि बौद्धिक स्वातंत्र्य यांना बाधा पोहोचू शकते. आजचा हा वाद केवळ एका नियमनापुरता मर्यादित नाही. तो भारतीय समाजाला सतत भेडसावणाऱ्या प्रश्नांचे प्रतिबिंब आहे. समता म्हणजे काय, अन्यायाची व्याख्या कोण ठरवतो, आणि राज्याची भूमिका किती हस्तक्षेपाची असावी, हे प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आले आहेत. निर्णय काहीही झाला तरी या चर्चेने एक गोष्ट स्पष्ट केली आहे. शिक्षण धोरणे केवळ कागदावर नव्हे, तर संवादातून, विश्वासातून आणि सर्वसमावेशक दृष्टिकोनातूनच घडली पाहिजेत. अन्यथा समतेच्या नावाखाली पुन्हा एकदा असमानताच वाढीस लागण्याची भीती आहे.

# मोकळ्या श्वासाचा प्रश्न आणि तंत्रज्ञान

**» वायुप्रदूषणाने शहरे गुदमरली असताना त्यावरील उपाय मात्र वरवरचे ठरत आहेत. अचूक माहिती, पूर्वसूचना आणि पारदर्शक निर्णयांसाठी तंत्रज्ञानाचा वापर शक्य आहे का आणि राजकीय इच्छाशक्ती त्याला साथ देईल का, हा खरा प्रश्न आता समोर उभा राहिला आहे.**



भारतात शुद्ध हवा हा प्रश्न आता केवळ पर्यावरणाचा राहिलेला नाही; तो आरोग्य, अर्थकारण, शहरी नियोजन आणि शासनक्षमता यांचा एकत्रित कस ठरला आहे. गेल्या काही वर्षांत हवेच्या प्रदूषणाने इतका उग्र चेहरा दाखवला आहे की, तो ऋतू, प्रदेश किंवा राजकीय घोषणांच्या चौकटीत बसणारा उरलेला नाही. राजधानीपासून लहान शहरांपर्यंत श्वास घेणेही धोक्याचे ठरत असताना, आपली धोरणे मात्र अजूनही जुन्याच सवयींमध्ये अडकलेली दिसतात. याच पार्श्वभूमीवर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराची चर्चा पुढे येते आणि 'तंत्रज्ञान आपल्याला मोकळा श्वास देऊ शकते का' हा प्रश्न उपस्थित होतो.

आतापर्यंत भारतातील वायुप्रदूषणावरील उपाय प्रामुख्याने प्रतिक्रियात्मक राहिले आहेत. हिवाळ्यात धूर वाढला की वाहतुकीवर निर्बंध, काही दिवस कारखाने बंद, शाळांना सुट्ट्या, आणि नंतर पुन्हा सर्व काही पूर्ववत. ही तात्पुरती मलमपट्टी आहे, उपचार नव्हे. प्रदूषणाचे मूळ स्वरूप समजून घेणे, त्याचे स्रोत अचूक ओळखणे आणि वेळेआधी उपाययोजना करणे, या बाबींमध्ये सातत्याने अपयश आले आहे. आज जी मोजमाप केंद्रे उपलब्ध आहेत, ती शहराची सरासरी स्थिती सांगतात. पण प्रदूषण सरासरी नसते. एखाद्या रस्त्यावर, शाळेजवळ, रुग्णालयाच्या परिसरात किंवा बांधकामाच्या ठिकाणी हवेची स्थिती फार वेगळी असू शकते. ही सूक्ष्म पातळीवरील माहिती उपलब्ध न झाल्याने धोरणेही ढोबळ राहतात. इथेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग पुढे येतो. कमी खर्चाची मोजमाप उपकरणे, सातत्याने जमा होणारी माहिती आणि तिचे विश्लेषण यांच्या माध्यमातून प्रदूषणाचे खरे स्वरूप उलगडू शकते.

कृत्रिम बुद्धिमत्ता केवळ आजची स्थिती सांगणारे साधन नाही; ती उद्याचा अंदाज देऊ शकते. हवामान, वाहतूक, औद्योगिक हालचाली, बांधकाम, शेतीतील जाळपोळ अशा अनेक घटकांचा एकत्र विचार करून प्रदूषण कधी, कुठे आणि किती वाढू शकते याचा पूर्वसंकेत मिळू शकतो. असा इशारा मिळाल्यास प्रशासनाकडे पर्याय असतात. वाहतुकीचे नियोजन बदलणे, काही उद्योगांना वेळेवर सूचना देणे, नागरिकांना सावध करणे, हे सर्व आधीच करता येऊ शकते. आज जिथे आपण प्रदूषण वाढल्यानंतर धावपळ करतो, तिथे उद्या त्याआधीच पावले उचलणे शक्य होईल.

याचा आणखी एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे पारदर्शकता. जेव्हा माहिती वस्तुनिष्ठ आणि सर्वांसमोर उपलब्ध असते, तेव्हा निर्णयांवर राजकीय किंवा प्रशासकीय सोयीसाठी पडदा टाकणे अवघड होते. कुठल्या भागात प्रदूषण जास्त आहे, त्याला कोण जबाबदार आहे आणि कोणत्या उपायांचा परिणाम झाला, हे स्पष्ट दिसू लागते. त्यामुळे जबाबदारी ठरवणे सोपे होते. नियम केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात उतरवण्याचा दबाव वाढतो.

नागरिकांच्या भूमिकेतही बदल होऊ शकतो. आज नागरिक प्रदूषणाचे बळी आहेत. पण अचूक माहिती उपलब्ध झाल्यास ते सहभागी होऊ शकतात. आपल्या परिसरातील हवेची स्थिती समजल्यावर वाहतुकीच्या सवयी बदलणे, तक्रारी नोंदवणे, स्थानिक पातळीवर दबाव निर्माण करणे शक्य होते. पर्यावरण हे केवळ सरकारी खात्याचे काम न राहता सामूहिक जबाबदारी बनते. तरीही कृत्रिम बुद्धिमत्तेकडे चमत्कारिक उपाय म्हणून पाहणे धोकादायक ठरेल. प्रदूषण कमी करण्यासाठी कठोर राजकीय निर्णय घेण्याची तयारी नसेल, तर कितीही अचूक माहिती निरुपयोगी ठरते.

वाहतूक धोरणे, इंधनाचे पर्याय, औद्योगिक नियम, शहरी विस्ताराची दिशा या सगळ्यांवर परिणामकारक निर्णय घेतल्याशिवाय तंत्रज्ञान केवळ आकडे जमा करणारे यंत्र बनेल. याशिवाय, या तंत्रज्ञानाची रचना भारतीय परिस्थितीशी सुसंगत असणे गरजेचे आहे. आपल्या शहरांची रचना, हवामान, लोकसंख्या घनता आणि सामाजिक वास्तव वेगळे आहे. बाहेरून आणलेली साचेबद्ध प्रणाली उपयोगी ठरणार नाही. खुली, विश्वासार्ह आणि देशांतर्गत पातळीवर विकसित केलेली व्यवस्था उभी करावी लागेल. माहितीचे स्वामित्व, गोपनीयता आणि वापर याबाबतही स्पष्ट धोरण आवश्यक आहे.

शेवटी प्रश्न तंत्रज्ञानाचा कमी आणि इच्छाशक्तीचा अधिक आहे. भारताकडे आज बौद्धिक क्षमता आहे, वैज्ञानिक जाण आहे आणि गरजही आहे. स्वच्छ हवा ही लक्झरी नाही; ती मूलभूत गरज आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता भारताला मोकळा श्वास देऊ शकते, पण त्यासाठी तिला केवळ प्रयोग म्हणून नव्हे, तर धोरणाचा केंद्रबिंदू म्हणून स्वीकारावे लागेल. अन्यथा आपण पुन्हा एकदा आकड्यांच्या गर्दीत गुदमरलेलेच राहू.

# पीसीएमसीत प्रजासत्ताक दिन उत्साहात

## अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या हस्ते ध्वजारोहण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी** : भारताच्या प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा वर्धापन दिन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात आयोजित ध्वजारोहण कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकाविण्यात आला. यावेळी त्यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचारी तसेच शहरवासियांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

ध्वजारोहणानंतर मार्गदर्शन करताना अतिरिक्त आयुक्त खोराटे म्हणाले, भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीस ७७ वर्षे पूर्ण होत असून हा दिवस लोकशाही मूल्यांचा, संविधानिक परंपरेचा आणि राष्ट्रनिर्मितीच्या सातत्यपूर्ण प्रवासाचा गौरव करणारा आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून स्वच्छता, आरोग्य, पायाभूत सुविधा, ई-प्रशासन आणि सांस्कृतिक क्षेत्रातील उपक्रमांमुळे शहराने देशपातळीवर वेगळी ओळख निर्माण केली आहे, असे त्यांनी सांगितले.

नागरिकांच्या सहकार्यामुळे विकासकामांना गती मिळाल्याचे नमूद करताना त्यांनी करप्रणाली अधिक सुलभ व पारदर्शक केल्यानंतर मिळकतकर भरण्यास नागरिकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल आभार मानले. उर्वरित तिमाहीत ज्यांनी अद्याप मिळकतकर भरलेला नाही, त्यांनी तो वेळेत भरून शहराच्या विकासात सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमास माजी महापौर योगेश बहल, नगरसदस्य मंदार देशपांडे, नगरसदस्या अनुराधा गोरखे, आशा सूर्यवंशी, मधुरा शिंदे यांच्यासह अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले, सहआयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, नगरसचिव मुकेश कोळप यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

# राईज इंडिया लीडरशिप समिटचे पुण्यात आयोजन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : दि इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया यांच्या वतीने 'राईज इंडिया : लीडरशिप समिट २०२६' ही राष्ट्रीय स्तरावरील परिषद येत्या ३० जानेवारी २०२६ रोजी पुण्यातील हॉटेल विवांता येथे होणार आहे.

'ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्समधील धोरणात्मक नेतृत्व : मूल्यनिर्मितीचे शिल्पकार म्हणून सीएमए' ही या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना असून, जागतिक व्यवसाय विश्वात कॉस्ट व मॅनेजमेंट अकाउंटंट्सची वाढती आणि निर्णायक भूमिका यावेळी अधोरेखित केली जाणार आहे.

आयसीएमएआयचे उपाध्यक्ष सीएमए नीरज धनंजय जोशी यांनी सांगितले की, भारत आज जागतिक स्तरावरील ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्सचे प्रमुख केंद्र बनला आहे. नवोन्मेष, विश्लेषण, वित्तीय नेतृत्व आणि डिजिटल परिवर्तनाच्या प्रक्रियेत या केंद्रांची भूमिका महत्त्वाची आहे. धोरण आखणी, खर्च नियंत्रण, कार्यप्रदर्शन विश्लेषण आणि जोखीम व्यवस्थापनातील कौशल्यामुळे सीएमए हे जीसीसीमध्ये धोरणात्मक भागीदार म्हणून मोलाचे योगदान देऊ शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले. या समिटमध्ये उद्योगजगताचे मान्यवर नेते, जीसीसी प्रमुख, वरिष्ठ वित्ततज्ज्ञ, धोरणकर्ते, शिक्षण क्षेत्रातील प्रतिनिधी तसेच सीएमए सदस्य सहभागी होणार आहेत. भविष्यातील नेतृत्व गरजा, जागतिक सर्वोत्तम पद्धती आणि बदलते व्यावसायिक वास्तव यावर सखोल चर्चा होणार आहे.

# विकसित भारतासाठी युवकांचा सहभाग आवश्यक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : विकसित भारताचे ध्येय साध्य करण्यासाठी आजच्या युवा पिढीचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक आहे. युवकांनी उत्कृष्टता, प्रामाणिकपणा आणि नवोन्मेष या मूल्यांना आत्मसात करून सातत्याने प्रगतीसाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठात भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. देसाई यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

डॉ. देसाई यांनी दावोस येथे झालेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममधील अनुभव सांगताना, भारताविषयी आणि विशेषतः महाराष्ट्रातील जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांविषयी आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांनी व्यक्त केलेल्या विश्वासाचा उल्लेख केला. विविध सामंजस्य करारांमुळे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीय गुंतवणूक येऊन रोजगारनिर्मिती होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, खजिनदार शांताराम गराडे, सचिव विठ्ठल काळभोर, व्यवस्थापन प्रतिनिधी अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे तसेच कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या सहभागातून योग, आरोग्य आणि एकतेचा जागर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी** : पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि आशा किरण सोशल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १२ वा जागतिक सूर्यनमस्कार महोत्सव चिंचवडगाव येथील मोरया गोसावी क्रीडांगणावर उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. या महोत्सवात शालेय विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत विविध वयोगटांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

एकाच वेळी सामूहिक सूर्यनमस्कार सादर करत सहभागी नागरिकांनी योग, आरोग्य आणि एकतेचा संदेश दिला. या उपक्रमातून शारीरिक व मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासोबतच प्राचीन भारतीय योगपरंपरेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी महापौर अर्पणा डोके, नगरसदस्य सुरेश भोईर, अनंत कोऱ्हाळे, उपआयुक्त पंकज पाटील, ममता शिंदे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर तसेच शहरातील नागरिक उपस्थित होते.

योगशिक्षक निर्मल गुप्ता, आशा किरण फाऊंडेशनचे अध्यक्ष रामकृष्ण पालमकर, वर्षा पवार आणि अविनाश गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी शिस्त, समन्वय आणि एकतेचे दर्शन घडवत सूर्यनमस्कार सादर केले.

यावेळी बोलताना उपआयुक्त पंकज पाटील यांनी सूर्यनमस्कारामुळे शरीरसामर्थ्य, लवचिकता, श्वसनशुद्धी आणि मानसिक स्थैर्य वाढते, असे सांगितले. तर नियमित सूर्यनमस्कार केल्यास तणावमुक्त जीवनशैली साध्य होऊ शकते, असे मत उपआयुक्त ममता शिंदे यांनी व्यक्त केले. महापालिकेच्या विविध माध्यमिक विद्यालयांनी सहभाग घेतला. वाकड, उद्यमनगर, काळभोरनगर, केशवनगर, पिंपळे गुरव, संत तुकारामनगर, फुगेवाडी, पिंपळे सौदागर, थेरगाव, खराळवाडी, नेहरूनगर, रुपीनगर, श्रमिकनगर (निगडी), पिंपरी नगर, कासारवाडी, लांडेवाडी, किवळे, चिंचवड, चऱ्होली, पिंपळे निलख तसेच उर्दू माध्यमिक विद्यालय व त्यांच्या भागशाळांचा सहभाग होता. क्रीडा अधिकारी रंगराव कारंडे, क्रीडा पर्यवेक्षक अरुण कडूस, विविध विद्यालयांचे मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण क्रीडांगणात सकारात्मक ऊर्जा आणि उत्साहाचे वातावरण अनुभवायला मिळाले.

# एआय-आधारित एकात्मिक सीसीटीव्ही प्रकल्पाला शासनाची मंजुरी

## पिंपरी-चिंचवडची सुरक्षा अधिक अभेद्य; गुन्हे, वाहतूक व गर्दी नियंत्रणाला बळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी** : गुन्हे नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन, गर्दी नियंत्रण आणि सार्वजनिक सुरक्षेला बळकटी देणाऱ्या एआय-आधारित एकात्मिक सीसीटीव्ही प्रकल्पास पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयासाठी अखेर शासनाच्या उच्चस्तरीय समितीची (एचपीसी) मान्यता मिळाली आहे. गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीने या प्रकल्पाला हिरवा कंदील दाखवल्याने शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

वेगाने नागरीकरण होत असलेले पिंपरी-चिंचवड शहर, वाढती लोकसंख्या, औद्योगिक विस्तार, एमआयडीसी परिसर आणि आयटी हबमुळे कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने अधिक संवेदनशील बनले आहे. या पार्श्वभूमीवर तंत्रज्ञानाधिष्ठित पोलिसिंगवर भर देत पोलिस आयुक्तालयाने शहरव्यापी एआय-आधारित सीसीटीव्ही प्रकल्पाचा प्रस्ताव सादर केला होता. त्यास आता अधिकृत मंजुरी मिळाली आहे.

देहू व आळंदी या धार्मिक तीर्थक्षेत्रांमध्ये तसेच सण-उत्सव, पालखी मिरवणुकीदरम्यान होणाऱ्या लाखोंच्या गर्दीचे नियोजन व वाहतूक नियंत्रण करण्यासाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरणार आहे. प्रगत एआय व्हिडिओ ॲनालिटिक्सच्या साहाय्याने संशयास्पद हालचाली, वाहतूक नियमभंग, गर्दीचा ताण तसेच आपत्कालीन परिस्थिती ओळखून तत्काळ प्रतिसाद देणे शक्य होणार आहे. या प्रणालीमुळे संशयास्पद हालचालींची ओळख, गुन्हे तपासाला त्वरित मदत, वाहतूक नियमभंग शोधणे आणि गर्दी नियंत्रण अधिक अचूकपणे करता येणार आहे. मानवी हस्तक्षेप कमी होऊन कारवाई अधिक वेगवान व परिणामकारक होणार आहे. या प्रकल्पाअंतर्गत पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी मिशन आणि महापालिकेमार्फत आधी बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे एकाच एकात्मिक प्रणालीत जोडले जाणार आहेत. त्यासोबतच, ज्या भागांत अद्याप कव्हरेज नाही तेथे नवीन सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहेत. विशेषतः चाकण, तळेगाव आणि भोसरी एमआयडीसी तसेच हिंजवडी आयटी हब परिसरात नजर ठेवली जाणार आहे.

नव्याने उभारण्यात येणाऱ्या पोलिस आयुक्तालयात अत्याधुनिक एकात्मिक कमांड अँड कंट्रोल सेंटर स्थापन केले जाणार आहे. येथील थेट दृश्ये परिमंडळ पोलिस उपआयुक्त, वाहतूक विभाग आणि संबंधित पोलिस ठाण्यांना उपलब्ध राहणार आहेत. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी पोलिस आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प अंमलबजावणी समिती स्थापन करण्यात आली असून, त्यात पीसीएमसी, पीएमआरडीए, स्मार्ट सिटी, एमआयडीसी आणि पोलिस विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. शहराची सुरक्षा अधिक सक्षम, आधुनिक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित करण्याच्या दिशेने एआय-आधारित एकात्मिक सीसीटीव्ही प्रकल्प हा निर्णायक टप्पा असल्याचे पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी सांगितले. या प्रकल्पामुळे गुन्हे नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन आणि आपत्कालीन परिस्थितीला तात्काळ प्रतिसाद देणे अधिक सुलभ होणार असून, स्मार्ट व सुरक्षित शहराच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

# पीएनजी ज्वेलर्ससोबत रणबीर कपूरची भागीदारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : महाराष्ट्राच्या मातीतून उभा राहिलेला आणि घराघरात विश्वासाचे प्रतीक ठरलेला 'पीएनजी ज्वेलर्स' आता आपल्या वाटचालीतील महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचला आहे. बॉलिवूडचा सुपरस्टार रणबीर कपूर याची पीएनजी ज्वेलर्सचा नवा ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, या ऐतिहासिक भागीदारीमुळे पीएनजी ज्वेलर्स देशपातळीवर अधिक भक्कमपणे आपला ठसा उमटवण्यासाठी सज्ज झाले आहेत.


१८३२ पासूनची समृद्ध परंपरा आणि आधुनिकतेची सांगड घालत पीएनजी ज्वेलर्सने विश्वास, मूल्ये आणि गुणवत्तेची ओळख निर्माण केली आहे. या परंपरेला नवी उंची देण्यासाठी रणबीर कपूरची साथ महत्त्वाची ठरणार आहे.

पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ यांनीही या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले. या सहकार्याच्या माध्यमातून पीएनजी ज्वेलर्स आपली ओळख विश्वासाचे प्रतीक, विकसित होत असलेला वारसा आणि कालातीत सौंदर्य म्हणून अधिक बळकट करत असून, परंपरा आणि आधुनिक भारत यांच्यातील नाते अधिक सशक्त करण्याचा प्रयत्न करत आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### भवानीनगर परिसरात बिबट्या दिसल्याने घबराट



**पुणे** : इंदापूर तालुक्यातील शिंदेवाडी आणि भवानीनगर परिसरात बिबट्याचा वावर आढळल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. २२ जानेवारी रोजी सायंकाळी शेतकरी कुलदीप पवार यांनी त्यांच्या द्राक्षाच्या बागेत बिबट्याचे दर्शन घेतले आणि त्याचा व्हिडिओ मोबाईलवर चित्रीत केला. सुरुवातीला ते रानमांजर समजले, पण काही क्षणातच बिबट्या असल्याचे लक्षात आले. ही माहिती मिळताच शिंदेवाडी पोलीस पाटील स्वप्नील शिंदे यांनी वन विभागाशी संपर्क साधला. वन विभागाची पथके घटनास्थळी दाखल झाली, द्राक्षाच्या बागेची पाहणी केली आणि पाऊलखुणांवरून बिबट्याचा वावर शोधण्यास सुरुवात केली. वन विभागाने नागरिकांना एकटे फिरणे टाळण्याचे आवाहन केले आहे. स्थानिकांना सतर्क राहणे गरजेचे आहे.

### ओतूरजवळ कार अपघातात दोघे जण ठार

**ओतूर** : ओतूर (ता. जुन्नर) हद्दीतील अहिल्यानगर-कल्याण महामार्गावरील कोळमाथा परिसरात नंदलाल लॉन्ससमोर स्विफ्ट कार पलटी होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात वरद एकनाथ तांबे (रा. ओतूर) आणि करण पवळे (रा. पिरंगुट) जागीच ठार झाले, तर अभिनव गणेश वाकचौरे आणि ओंकार गोरक्ष शिंदे (रा. साकूर मांडवे) गंभीर जखमी झाले आहेत. घटना आज (दि. २७) पहाटे सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास घडली. जखमी दोघांना उपचारासाठी तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून पोलिसांनी घटनास्थळी तातडीने पाहणी करून तपास सुरू केला आहे. अपघाताच्या कारणांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

## प्रथा परंपरांचे पालन करत धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

# मेदनकरवाडीत रथसप्तमी उत्साहात साजरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** येथील मेदनकरवाडीत श्री खंडोबा देवस्थान श्रींचे मंदिरात रथ सप्तमी प्रथा परंपरांचे पालन करीत परंपरेने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करीत उत्साहात साजरी करण्यात आली. मंदिरावर लक्षवेधी विद्युत रोषणाई आणि रथसप्तमी निमित्ताने श्री खंडोबा महाराज यांचा पुष्प सजावटीने सजलेला वैभवी मानाचा गाडा पुजन उत्साहात भंडार वाहत पूजा करण्यात आली. यावेळी भाविकांनी दर्शनास गर्दी केली. रांगा लावून श्रींचे, मानाचा गाडा भाविकांनी दर्शन घेतले. यावेळी भाविकांनी रांगेत दर्शन घेत रथ सप्तमी साजरी केली.

मेदनकरवाडी श्री खंडोबा महाराज यांचे सेवेकरी म्हणून चऱ्होली, कुरूळी आणि चाकण या परिसरातून मानकरी येत असतात. येथील लोकांचा मान असतो. राज्यातून भाविक नवसाचा देव पावतो म्हणून



गणना होते. पहाटे पाच वाजल्या पासून ते संध्याकाळी श्री खंडोबा महाराज यांची पुजा व देवाची पदे रथ सप्तमी दिनी गायन झाली.

श्री खंडोबा महाराज मंदिराचे सेवेकरी अरूण तोडकर आणि गावातील लहान, थोर मंडळी रथसप्तमी ते माघ पौर्णिमा पर्यंत देवाची परंपरेने पूजा करतात. रथसप्तमी दिनी श्रींची पूजा, आरती झाल्या नंतर भाविकांना अन्नदान महाप्रसादचे वाटप करण्यात आले.

श्री खंडोबा महाराज यांचा मानाचा गाडा रथसप्तमी दिनी परंपरेने पुजन करण्यात आले. रथ सप्तमी ते माघ पौर्णिमा या नऊ दिवसांमध्ये गाड्या ला भाविक पाणी घालण्याची परंपरा कायम आहे. मेदनकरवाडीतील श्री खंडोबा देवस्थान राज्यात सर्व परिचित प्रसिद्ध श्रीक्षेत्र आहे. मेदनकरवाडीत श्री खंडोबा मंदिरा समोर रथ सप्तमी निमित्त बैल गाडा पूजन तसेच भाविकांनी दर्शनास गर्दी करून प्रथा परंपरांचे पालन करीत श्रींचे दर्शन घेतले. या वेळी महाप्रसाद वाटप उत्साहात करण्यात आले.

## आळंदीत नर्मदा जयंती दिनी इंद्रायणी घाटावर आरती



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी** : येथील इंद्रायणी नदी घाटावर इंद्रायणी आरती सेवा समिती, आळंदी यांच्या वतीने नर्मदा जयंती व रथ सप्तमी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रथा व परंपरांचे पालन करीत नर्मदा आरती, इंद्रायणी माता व नर्मदा माता नामजयघोष, वारकरी सांप्रदायिक भजन सेवा तसेच पंचपदी आदी धार्मिक उपक्रम मोठ्या भक्तिभावात पार पडले.

या प्रसंगी दिनकर तांबे यांच्या हस्ते नर्मदा प्रतिमा पूजन तसेच कन्या पूजन करण्यात आले. कार्यक्रमास रविंद्र महाराज कुमकर, दिलीप महाराज ठाकरे, इंद्रायणी आरती सेवा समितीचे संयोजक अर्जुन मेदनकर, दिनकर तांबे, अशोक महाराज सालपे यांच्यासह श्री रामकृष्ण वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मोहन महाराज शिंदे, संस्थेतील साधक वारकरी, विद्यार्थी-विद्यार्थिनी, वारकरी संप्रदायाचे भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी हरिनाम जयघोषाने संपूर्ण घाट परिसर भक्तिरसाने भारावून गेला. गेल्या तीन वर्षांपासून इंद्रायणी नदी घाटावर नर्मदा जयंती व रथ सप्तमी साजरी करण्यात येत असल्याची माहिती अर्जुन मेदनकर यांनी दिली.

## जिल्हा परिषद निवडणुकीत दिग्गज आणि नव्या चेहऱ्यांची रंगतदार लढत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** मिनी मंत्रालय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे जिल्हा परिषद निवडणुकीचे पडघम वाजले आहेत. तब्बल नऊ वर्षांच्या अंतरानंतर होणाऱ्या या निवडणुकीत आजी-माजी सदस्यांनी दंड थोपटले असून, ग्रामीण भागात निवडणुकीचा उत्साह शिगेला पोहचला आहे. अनेक दिग्गज आणि काही नव्या चेहऱ्यांनी निवडणूक रिंगणात प्रवेश केला आहे, त्यामुळे यंदाची लढत अधिक रंगतदार होणार आहे.



जिल्हा परिषद निवडणुकीसाठी आतापर्यंत ५९८ उमेदवारांनी अर्ज केले आहेत. अर्ज माघारी घेण्याची शेवटची तारीख २७ जानेवारी असून, काही उमेदवार अजून गळण्याची शक्यता आहे. माजी सभापती व पदाधिकाऱ्यांसह अनेक अनुभवी सदस्य विविध गटातून उमेदवारी अर्ज दाखल करत आहेत.

भोर तालुक्यातील उत्रौली-कारी गटातून माजी उपाध्यक्ष रणजित शिवतारे राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक लढवत आहेत. जुन्नर तालुक्यातील सावरगाव-कुसूर गटात भाजपच्या आशा बुचके आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे गुलाब पारखे मैदानात आहेत. आंबेगाव तालुक्यातील पारगाव अवसरी गटातून माजी उपाध्यक्ष व माजी मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील यांचे पुतणे विवेक वळसे पाटील निवडणूक लढवत आहेत. कळंब-चांडोली गटातून तुलसी भोर मैदानात आहेत. वडगाव-मांडवगण गटातून सुजाता पवार, भोलावडे शिंद गटातून विठ्ठल आवळे, बेलसर गटातून दत्ता झुरंगे, दौंड तालुक्यातील खडकी-देऊळगावराजे गटातून वीरधवल जगदाळे, इंदापूर तालुक्यातील बावडा गटातून अंकिता पाटील, रांजणगाव सांडस गटातून रेखा बांदल, खेड-शिवापूर-खानापूर गटातून माजी महिला व बालकल्याण सभापती पूजा पारगे या विविध गटांमध्ये निवडणूक लढत आहेत.

अनुभवी माजी सदस्यांची मोठी फौज मैदानात उतरल्यामुळे यंदाची जिल्हा परिषद निवडणूक चुरशीच्या आणि प्रतिष्ठेच्या लढतीची झळक पाहायला मिळेल. पुणे महापालिकेत भाजपने एकहाती सत्ता मिळवल्यानंतर आता जिल्ह्याच्या राजकारणातही राष्ट्रवादी काँग्रेसशी थेट स्पर्धा रंगणार आहे. कोण बाजी मारणार हे सात फेब्रुवारीला स्पष्ट होणार आहे.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त वृक्षारोपण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपळवंडी :** शिवलोणी-धामणी २६ जानेवारी अर्थात प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शिरदाळे (ता. आंबेगाव ) येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वृक्षारोपण संपन्न झाले. ७७ व्या प्रजासत्ताकदिन निमित्त वृक्षारोपण करून अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा परिसर मैदानात अनेक फळझाडांची लागवड करण्यात आली. त्यामध्ये आंबा, चिक्कू, चिंच, फणस, जांभूळ अशा तब्बल दहा ते १५फूट उंचीचा वृक्षांची लागवड श्रमदानातून करण्यात आली.

जिल्हा परिषद शाळा आणि ग्रामपंचायत शिरदाळे यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला होता.ग्रामस्थांनी देखील या स्तुत्य उपक्रमाला उत्तम प्रतिसाद देत या पवित्र कामाला हातभार लावला. यावेळी या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य करणाऱ्या मंडळींचा सन्मान शाळेच्या वतीने करण्यात आला. त्यामध्ये प्रथमतः स्वतःच्या शेतातील



माती दिल्याबद्दल बाळासाहेब ठकाराम रणपिसे, कमी मानधनात खड्डे घेतल्याबद्दल संजय किसन तांबे व संभाजी बबन सरडे तसेच खेड वरून वृक्ष आणण्यासाठी मदत केल्याबद्दल तुषार रणपिसे यांचा, तर ते वृक्ष खाली करण्यासाठी मदत केल्याबद्दल शंकर तांबे यांचा सन्मान यावेळी मुख्याध्यापक राजू ढोबळे व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष निवृत्ती तांबे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

युवा वर्गाने तसेच सरपंच सुप्रिया मनोज तांबे, उपसरपंच बिपिन चौधरी, माजी उपसरपंच मयूर सरडे, गणेश तांबे, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, शिक्षक व अंगणवाडी सेविका यांनी ग्रामस्थांच्या सोबत वृक्षारोपण करून श्रमदान केले. भविष्यात या वृक्षांचा चांगला फायदा शाळा परिसरात होणार असून यात एकही रायवळ जातीचे झाड नसून उत्तम फळे देणारी झाडे आहेत. सर्व ग्रामस्थांनी या स्तुत्य उपक्रमासाठी सहकार्य केल्याबद्दल शाळेच्या वतीने व ग्रामपंचायतच्या वतीने आभार मानण्यात आले. खाऊ वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## आंबेगावात बटाटा उत्पादक शेतकरी नाराज

### नागापूरच्या दौलत भोर यांनी घेतले भरघोस उत्पादन, भाव न मिळाल्याने निराशा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव:** आंबेगाव तालुक्यातील नागापूर गावातील शेतकरी दौलत शंकर भोर यांनी यंदाच्या हंगामात बटाट्याचे भरघोस उत्पादन घेतले आहे. योग्य मशागत, वेळेवर पाणीपुरवठा तसेच खत व कीटकनाशकांचा नियोजनबद्ध वापर केल्यामुळे त्यांच्या शेतात बटाट्याचे पीक जोमात आले असून एका पिशवीत २० ते २२ किलो बटाट्याचा गळीत निघाल्याचे समाधानकारक उत्पादन प्राप्त झाले आहे.



तरीही, उत्पादन भरपूर असले तरी बाजारात अपेक्षित भाव न मिळाल्यामुळे शेतकरी दौलत भोर यांच्यासह परिसरातील अनेक बटाटा उत्पादकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्या बाजारात आवक मोठ्या प्रमाणावर वाढल्याने बटाट्याचे दर घसरले आहेत. मिळणारा भाव खर्चही भागवणारा नसल्याचे स्पष्ट केले.

बियाणे, खत, औषधे, मजुरी तसेच वाहतूक खर्च वाढले असताना बाजारभाव अत्यंत कमी मिळत असल्याने आर्थिक गणित कोलमडले आहे. दौलत भोर यांनी सांगितले, "पीक चांगले आले म्हणून आनंद होता, पण बाजारात माल विक्रीस नेल्यावर निराशा पदरी पडली. एवढे कष्ट घेऊनही योग्य मोबदला मिळत नसेल तर शेती करायची तरी कशी?"

आंबेगाव तालुक्यात यंदा बटाट्याचे क्षेत्र वाढले असून उत्पादन चांगले झाले असले तरी बाजारातील दर नियंत्रणासाठी कोणतीही ठोस व्यवस्था नसल्याने शेतकरी अडचणीत आहेत. शेतकऱ्यांच्या मते, शासनाने हस्तक्षेप करून हमीभाव, साठवणूक व्यवस्था किंवा थेट बाजारपेठ उपलब्ध करून दिल्यास बटाटा उत्पादकांना आर्थिक दिलासा मिळेल.

### भवानीनगरमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**भवानीनगर :** येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन भवानीनगर येथे उत्साहात साजरा करण्यात आला. श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या प्रशासकीय इमारतीसमोर कारखान्याचे उपाध्यक्ष कैलास गावडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच, श्री छत्रपती मुलांचे हायस्कूल, मुलींचे हायस्कूल, इंग्लिश मीडियम शाळा आणि ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त ध्वजारोहणाचे कार्यक्रम माजी सैनिक बाळासाहेब कोळेकर यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमास श्री छत्रपती कारखाना व शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक, संचालक रामचंद्र निंबाळकर, शिवाजीराव निंबाळकर, अशोक पाटील, प्रशांत दराडे, बाळासाहेब कोळेकर, सतीश देवकाते, संतोष मासाळ, निलेश टिळेकर, सुचिता सपकळ, कार्यकारी संचालक अशोक जाधव आदी उपस्थित होते.

## कांद्याला डेंगळे आल्याने मोठे नुकसान

### आंबेगाव तालुक्यातील नागापूरमध्ये कांदा उत्पादक अडचणीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील नागापूर गावातील शेतकरी मधुकर श्रीहरी टेमगिरे यांच्या शेतात कांद्याच्या पिकाला मोठ्या प्रमाणावर डेंगळे (फुलोरा) आल्याने गंभीर नुकसान झाले आहे. यंदाच्या हंगामात मोठ्या अपेक्षेने कांद्याची लागवड करण्यात आली होती; मात्र पदरी निराशाच पडल्याचे चित्र आहे.

सध्या कांद्याची काढणी सुरू असून शेतातून निघणारे कांदे आकाराने लहान व वजनाने हलके आहेत. त्यामुळे बाजारात अपेक्षित दर मिळणे अशक्य बनले आहे. उत्पादनात मोठी घट झाल्याने शेतकऱ्याचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले असून लागवड, खत, औषधे आणि मजुरी यावर झालेला खर्च



वसूल होईल की नाही, याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. या नुकसानाबाबत संबंधित बी-बियाणे दुकानदार व कंपनीच्या प्रतिनिधींशी संपर्क साधला असता, त्यांनी हवामानातील बदलामुळे डेंगळे आल्याचे कारण दिले. मात्र पिकाची प्रत्यक्ष पाहणी न केल्याने नाराजी अधिकच वाढली आहे. आधीच बाजारात कांद्याचे दर घसरलेले असताना, त्यातच डेंगळ्यांमुळे उत्पादनात झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे.

बी-बियाणे दुकानदार व कंपनी प्रतिनिधींना माहिती दिली; मात्र त्यांनी पिकाची पाहणीही केली नाही. कांदा काढण्यासाठी मजुरी देणेही कठीण झाले आहे, असे कांदा उत्पादक मधुकर टेमगिरे, सुजाता टेमगिरे यांनी सांगितले.

### मृत्यूच्या जागी उगवतोय जीवनाचा श्वास

## कान्हूर मेसाई स्मशानभूमीत तरुणांचा आदर्शवत उपक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** शिरूर तालुक्यातील कान्हूर मेसाई गावात तरुणांनी हाती घेतलेला उपक्रम केवळ कौतुकास्पद नसून संपूर्ण समाजाला विचार करायला लावणारा आहे. वर्षानुवर्षे दुर्लक्षित राहिलेली स्मशानभूमी आज या तरुणांच्या प्रयत्नांमुळे हरितक्रांतीचे प्रतीक बनू लागली आहे. स्मशानभूमीत विविध प्रकारची झाडे लावून सुशोभीकरण करण्याचे धाडस या तरुणांनी दाखवले असून, ग्रामपंचायतीनेही या उपक्रमाला मर्यादित स्वरूपात हातभार लावला आहे. मात्र या



कामाचा खरा कणा ठरले आहेत ते गावातील हे तरुणच.

या उपक्रमामागील भावना अत्यंत अर्थपूर्ण आहे. तरुणांशी संवाद साधला असता ते सांगतात, "या ठिकाणी आल्यावर देवळात आल्यासारखी शांतता आणि पवित्रता जाणवली पाहिजे. आयुष्यात प्रत्येकालाच कधीतरी येथे यावे लागते. मग ही जागा केवळ भयावह न राहता सकारात्मकतेचा संदेश देणारी का नसावी?"

वृक्षारोपण करताना केवळ दिखाऊपणा न करता दीर्घकालीन विचार करण्यात आला आहे. झाडांच्या संगोपनासाठी ठिबक सिंचनाची व्यवस्था करण्यात आली असून, पाण्याची टाकी नसल्याने सध्या अडचण निर्माण होत आहे. मात्र ही कमतरता लवकरच दूर करण्याचा निर्धार तरुणांनी व्यक्त केला आहे.

स्मशानभूमीच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर खडक असल्याने काळी माती टाकण्याची गरज आहे. काही संवेदनशील ग्रामस्थांनी पुढाकार घेत मदत केली असली, तरी हा उपक्रम सातत्याने पुढे नेण्यासाठी समाजाच्या एकत्रित पाठिंब्याची नितांत आवश्यकता आहे.

पाण्याची टाकी, माती किंवा अन्य साहित्याच्या स्वरूपात मदत करू शकणाऱ्यांनी पुढे यावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

जिथे फक्त अंत्यसंस्कारांची आठवण असते, त्या स्मशानभूमीत आज हिरवळ फुलवली जात आहे. हा उपक्रम केवळ कान्हूर मेसाईपुरता मर्यादित न राहता प्रत्येक गावासाठी प्रेरणादायी ठरावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. राजकारण, उद्घाटन आणि फोटोसेशनच्या पलीकडे जाऊन समाजासाठी काहीतरी करून दाखवणारे हे तरुण खऱ्या अर्थाने ग्रामविकासाचे शिल्पकार ठरत आहेत.

## उमेदवारांच्या यशासाठी प्रार्थना



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व उमेदवार निवडून यावेत, तसेच माजी गृहमंत्री व आंबेगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार दिलीप वळसे पाटील यांचे हात बळकट व्हावेत, यासाठी पारगावचे माजी उपसरपंच विठ्ठल सिताराम ढोबळे यांच्या पुढाकाराने आळंदी मधील सिद्धेश्वर मंदिरात अभिषेक व आरती आयोजित करण्यात आली.

या कार्यक्रमानंतर उपस्थितांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराज समाधीचे दर्शन घेऊन सर्व उमेदवारांच्या विजयासाठी प्रार्थना केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी उपसरपंच विठ्ठल सिताराम ढोबळे यांनी बोलताना सांगितले की, आंबेगाव तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व उमेदवारांचा विजय निश्चित असून मतदारांचा पक्षावर ठाम विश्वास आहे. तसेच भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांनी आगामी काळात सर्व विजयी उमेदवारांसह दर्शनासाठी येण्याचे आश्वासन दिले.

## सारांश वृत्त

### १४ लाख वाचकांची कोलकाता पुस्तक मेळाव्याला भेट

**कोलकाता :** २३ जानेवारी रोजी जनतेसाठी खुले झाल्यापासून चार दिवसांत अंदाजे १४ लाख लोकांनी ४९ व्या आंतरराष्ट्रीय कोलकाता पुस्तक मेळ्याला भेट दिली आहे, असे आयोजकांनी मंगळवारी सांगितले. आशियातील सर्वात मोठा साहित्यिक कार्यक्रम असलेल्या या पुस्तक मेळ्याचे उद्घाटन मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या हस्ते २२ जानेवारी रोजी झाले आणि ते ३ फेब्रुवारी रोजी संपेल. सोमवारी - प्रजासत्ताक दिनाच्या सुट्टीच्या दिवशी - चार लाख ग्रंथप्रेमी पुस्तक मेळ्यात आले होते, तर रविवारी ही संख्या तितकीच ४ लाख होती.

### अयोध्येत जीएसटी उपायुक्तांचा राजीनामा

**अयोध्या (उत्तर प्रदेश) :** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याविरुद्ध शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी केलेल्या "आक्षेपार्ह" वक्तव्याच्या निषेधार्थ जीएसटी उपायुक्त प्रशांत कुमार सिंह यांनी मंगळवारी राजीनामा दिला. प्रयागराजच्या पवित्र भूमीवरून जात आणि धर्माच्या आधारावर देशाचे विभाजन करण्याचे अलिकडचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगून सिंग म्हणाले की, त्यांना खूप वाईट वाटले आहे. सरकार, संविधान आणि देशाच्या निवडून आलेल्या नेतृत्वाच्या समर्थनार्थ आपण राजीनामा देत असल्याचे सिंग यांनी सांगितले.

### तिम्मापूर यांच्या राजीनाम्याची मागणी

**बेंगळुरू :** भाजपने कर्नाटक विधानसभेत आणि बाहेरही काँग्रेस सरकारवर दबाव आणत राहिल्याचे सांगत उत्पादन शुल्क मंत्री आर.बी. तिम्मापूर यांच्या खात्यातील कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याबद्दल राजीनामा देण्याची मागणी केली. सभागृह सुरू होताच, भाजप सदस्यांनी विधानसभेच्या वेलमध्ये धाव घेतली आणि त्यांच्या मागणीचा पुनरुच्चार केला. शुक्रवारी विरोधकांनी पहिल्यांदा हा मुद्दा उपस्थित केला होता.

---

### ममता बॅनर्जी २८ जानेवारीला नवी दिल्लीत

# एसआयआरविरोधातील लढा राजधानीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) प्रक्रियेविरोधातील आंदोलन आता राष्ट्रीय पातळीवर नेण्याच्या तयारीत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आहेत. हुगळी जिल्ह्यातील सिंगूर येथे रॅलीला उपस्थित राहिल्यानंतर त्या २८ जानेवारी रोजी दिल्लीला रवाना होणार आहेत. भारतीय निवडणूक आयोगाविरोधात सुरू असलेला निषेध अधिक तीव्र करणे, हा त्यांच्या दिल्ली दौऱ्याचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, डायमंड हार्बरचे तृणमूल काँग्रेसचे खासदार आणि पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी हेही मंगळवारी संध्याकाळी दिल्लीला रवाना होणार आहेत. पक्षातील सूत्रांच्या माहितीनुसार, ते ममता बॅनर्जींसोबत निवडणूक आयोगाविरोधातील निषेध कार्यक्रमात सहभागी होतील. दोन्ही नेते ३ फेब्रुवारीपर्यंत दिल्लीत मुक्काम करणार असल्याचेही स्पष्ट झाले आहे.

याआधी ममता बॅनर्जी फेब्रुवारीमध्ये दिल्लीला जाणार होत्या, मात्र सध्याच्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या दौऱ्याचे वेळापत्रक बदलण्यात आले आहे. राज्य सचिवालय आणि तृणमूल काँग्रेसच्या सूत्रांनी सांगितले की, सहा दिवसांचा हा दिल्ली दौरा एसआयआर प्रक्रियेच्या विरोधात निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

एसआयआरच्या अंमलबजावणीनंतर पश्चिम बंगालमध्ये आतापर्यंत सुमारे ५८ लाख मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. याशिवाय 'तार्किक विसंगती' आणि 'अनमॅप्ड' या कारणांखाली सुमारे १.५ कोटी मतदारांना नोटिसा बजावण्यात आल्या असून, त्यांना राज्यभरातील सुनावणी केंद्रांवर हजर राहण्यास सांगण्यात आले आहे. या प्रक्रियेवरून तृणमूल काँग्रेसने तीव्र आक्षेप घेतला आहे.

पक्षातील सूत्रांनी सांगितले की, दिल्लीतील मुक्कामादरम्यानचा तपशीलवार कार्यक्रम ममता बॅनर्जी राजधानीत पोहोचल्यानंतर अंतिम केला जाईल. मात्र, गुरुवारपासून तृणमूल काँग्रेसचे खासदार आणि इतर नेते निर्वाचन सदनसमोर धरणे आंदोलन करण्याची शक्यता आहे. या आंदोलनाचे नेतृत्व ममता बॅनर्जी स्वतः करणार आहेत. तथापि, दिल्ली पोलिसांकडून निवडणूक आयोगाच्या मुख्यालयासमोर किंवा संसद भवन परिसरात निषेध करण्यास परवानगी मिळेल की नाही, याबाबत अद्याप अनिश्चितता आहे.

पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एसआयआर प्रक्रियेशी संबंधित कथित मृत्यूंमुळे ममता बॅनर्जी अत्यंत नाराज असल्याचे सांगितले जाते. त्यांनी मुख्य निवडणूक अधिकारी ज्ञानेश कुमार यांना या संदर्भात अनेक पत्रे लिहिली, मात्र निवडणूक आयोगाकडून मिळालेल्या प्रतिसादाने त्या समाधानी नाहीत. त्यामुळेच हा निषेध दिल्लीपर्यंत नेण्याचा निर्णय घेतल्याचे पक्षातील सूत्रांचे म्हणणे आहे.

तृणमूल काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांच्या मते, या दौऱ्यादरम्यान एसआयआरविरोधात व्यापक विरोधी पक्षांचे एकमत तयार करण्यावरही भर दिला जाणार आहे. ४ नोव्हेंबर रोजी बंगालमध्ये एसआयआर प्रक्रिया सुरू झाल्याच्याच दिवशी ममता बॅनर्जी आणि अभिषेक बॅनर्जी यांनी कोलकात्यात मोठ्या मोर्चाचे नेतृत्व केले होते.

दरम्यान, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण १ फेब्रुवारी रोजी संसदेत अर्थसंकल्प सादर करणार आहेत. त्यानंतर किमान दोन आठवडे अर्थसंकल्पीय अधिवेशन चालणार आहे. या काळात ममता बॅनर्जी पंतप्रधान नरेंद्र मोदी किंवा केंद्रीय मंत्रिमंडळातील वरिष्ठ नेत्यांची भेट घेऊन बंगालशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा करतील का, याबाबत अद्याप स्पष्टता नाही.

---

# सर्वोच्च न्यायालयाचा सुनावणीस नकार

### बार कौन्सिलमध्ये आरक्षणाची मागणी फेटाळली

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** राज्य बार कौन्सिलमध्ये अनुसूचित जाती व जमातीच्या वकिलांना आरक्षण देण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी सुनावणी करण्यास नकार दिला. निवडणूक प्रक्रिया आधीच सुरू झाल्यानंतर याचिका दाखल झाल्याने ही मागणी उशिराची असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

मुख्य न्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती आर. महादेवन आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने सध्याच्या निवडणुकांसाठी अशा प्रकारचे प्रतिनिधित्व मागणे शक्य नसल्याचे नमूद केले. याचिकाकर्त्यांनी महिला वकिलांना प्रतिनिधित्व देण्याच्या पूर्वीच्या आदेशाचा आधार घेतला; मात्र न्यायालयाने स्पष्ट केले की, महिलांसाठी दिलेला दिलासा 'आरक्षण' नसून दीर्घकाळच्या कमी प्रतिनिधित्वावर उपाय म्हणून 'प्रतिनिधित्व' होता.

याचिकाकर्त्यांनी निवडणूक जाहीर झाल्यानंतरच न्यायालयात धाव घेतल्याबद्दल खंडपीठाने नाराजी व्यक्त केली आणि प्रथम सक्षम वैधानिक अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करण्याचा सल्ला दिला. आवश्यक तेथे पुढील निवडणुकीसाठी न्यायालयीन हस्तक्षेप मागता येईल, असेही स्पष्ट करण्यात आले. तसेच, बार कौन्सिल ऑफ इंडियासह संबंधित अधिकाऱ्यांनी आधीच्या आदेशांचा विचार करून निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करत खंडपीठाने याचिका निकाली काढली.

---

# सीआरपीएफ जवानांसह चौघांचा मृत्यू

### जम्मू-श्रीनगर महामार्गावर बस आणि ट्रकची भीषण धडक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जम्मू :** जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर मंगळवारी काळाने भीषण घाला घातला. उधमपूर जिल्ह्यात एक प्रवासी बस आणि पिकअप ट्रक यांच्यात झालेल्या जोरदार धडकेत सीआरपीएफ जवानासह एकूण चार जणांना आपला प्राण गमवावा लागला आहे. या अपघातात अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, उधमपूर परिसरात बस आणि पिकअप ट्रकची समोरासमोर धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. सीआरपीएफच्या १३७ व्या बटालियनचे सेकंड-इन-कमांड करतार सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, या अपघातात ५२ व्या बटालियनच्या एका जवानाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य राबवले आणि मृतदेह विच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवले. अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला आहे. दुसरीकडे, डोडा जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी खराब हवामानामुळे लष्कराचे वाहन घसरून झालेल्या अपघातात जवान रिंकिल बालियान यांच्यासह नऊ सैनिक शहीद झाले होते. या दुःखद घटनेनंतर संपूर्ण देशात हळहळ व्यक्त केली जात आहे.

भाजप खासदार अरुण गोविल आणि भाजप नेते संजीव बालियान यांनी शहीद रिंकिल बालियान यांच्या निवासस्थानी भेट दिली. त्यांनी शहीद जवानाच्या पार्थिवाचे दर्शन घेऊन त्यांच्या कुटुंबाचे सांत्वन केले. कठीण प्रसंगात सरकार आणि पक्ष शहीद कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याची ग्वाही यावेळी नेत्यांनी दिली.

---

# बर्फवृष्टीमुळे श्रीनगरमधील विमानसेवा रद्द

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**श्रीनगर :** श्रीनगर विमानतळावरील येणारी - जाणारी सर्व उड्डाणे सततच्या बर्फवृष्टीमुळे आणि खराब हवामानामुळे रद्द करण्यात आली आहेत. नवीन बर्फवृष्टी झाल्याने श्रीनगर-जम्मू राष्ट्रीय महामार्ग देखील बंद झाला आणि वाहतूक विस्कळीत झाली आहे.

मंगळवार काश्मीरमध्ये झालेल्या बर्फवृष्टीमुळे श्रीनगर आंतरराष्ट्रीय विमानतळावर येणारी आणि जाणारी ५० विमान उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत असे अधिकाऱ्यांनी सांगितले. "खराब हवामान आणि श्रीनगर विमानतळावर सुरू असलेल्या बर्फवृष्टीमुळे, विमान कंपन्यांनी आजची बहुतेक उड्डाणे रद्द केली आहेत," असे भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या एका अधिकाऱ्यांनी सांगितले. श्रीनगर विमानतळावर आज चार विमाने येण्याचे नियोजित होते परंतु खराब हवामानामुळे हे शक्य नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. तसेच ताज्या अपडेट्स आणि पर्यायी व्यवस्थांसाठी प्रवाशांना त्यांच्या संबंधित विमान कंपन्यांच्या संपर्कात राहण्याचा सल्ला देखील त्यांनी यावेळी दिला.

विमानांची उड्डाणे रद्द झाल्यामुळे काश्मीरमध्ये हजारो पर्यटक अडकून पडले आहेत. नवयुग बोगदा आणि आसपासच्या परिसरात सुरू असणाऱ्या सततच्या बर्फवृष्टीमुळे मंगळवारी तेथील काही महामार्ग देखील वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त मुघल रोड, एसएसजी रोड आणि सिंथन रोड देखील निसारड्या रस्त्यामुळे वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला आहे. पुढील सूचना मिळेपर्यंत जम्मूहून श्रीनगर पर्यंत आणि श्रीनगरवरून जम्मू पर्यंत कोणत्याही वाहनांना प्रवास करण्याची परवानगी नसेल. सोमवार २६ जानेवारी संध्याकाळपासून राज्यात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस आणि बर्फवृष्टीची शक्यता श्रीनगर येथील हवामान खात्याने वर्तवली होती. तसेच काही डोंगराळ भागात दरड कोसळण्याची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे.

---

# ममता बॅनर्जींच्या लढ्याला सपाचा पाठिंबा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता:** समाजवादी पक्षाचे अध्यक्ष आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी मंगळवारी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या भाजप विरोधी मोहिमेला तोंड देण्यासाठी सुरू असलेल्या राजकीय संघर्षाचे उघडपणे कौतुक केले. लोकशाही वाचवण्यासाठी ममता बॅनर्जी ज्या पद्धतीने भूमिका घेत आहेत, ती देशासाठी महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कोलकाता येथील राज्य सचिवालय 'नबन्ना' येथे ममता बॅनर्जी यांची भेट घेतल्यानंतर अखिलेश यादव यांनी माध्यमांशी संवाद साधला. या बैठकीला अखिलेश यांच्या पत्नी आणि समाजवादी पक्षाच्या लोकसभा खासदार डिंपल यादव उपस्थित होत्या. या बैठकीत राजकारण, लोकशाहीसमोरील आव्हाने आणि निवडणूक प्रक्रियेतील वादग्रस्त मुद्द्यांवर चर्चा झाल्याचे सांगितले जाते.

बैठकीनंतर अखिलेश यादव म्हणाले, "लोकशाही वाचवण्यासाठी ममता बॅनर्जी ज्या प्रकारे भाजपविरोधात ठामपणे उभ्या आहेत, त्या लढ्याला समाजवादी पक्षाचा पूर्ण पाठिंबा आहे. या देशात भाजपच्या हल्ल्याचा सामना करण्याची ताकद फक्त 'दीदीं'मध्ये आहे." यावेळी अखिलेश यादव यांनी मतदार यादीच्या विशेष सघन सुधारणांवर (एसआयआर) तीव्र टीका केली. "एसआयआरच्या नावाखाली प्रत्यक्षात एनआरसी लागू करण्याचा प्रयत्न होत आहे. या प्रक्रियेच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना त्रास देण्याचा डाव रचला जात आहे," असा आरोप त्यांनी केला.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी यापूर्वीच एसआयआर प्रक्रियेला "मोठा घोटाळा" असे संबोधले आहे. आयोगाकडून राबवली जात असलेली ही प्रक्रिया त्वरित थांबवावी, अशी मागणी करत त्यांनी आयोगाला अनेक पत्रे लिहिली आहेत.

---

### सर्वोच्च न्यायालयाने अपील फेटाळले

# महाकाल मंदिरातील व्हीआयपी दर्शन कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** उज्जैन येथील श्री महाकालेश्वर मंदिरात सुरू असलेली 'व्हीआयपी दर्शन' व्यवस्था कायम ठेवणाऱ्या मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणारी अपील सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी फेटाळून लावली. मंदिरातील गर्भगृहात सामान्य आणि व्हीआयपी भाविकांमध्ये भेदभाव होऊ नये, अशी मागणी करणारी याचिका न्यायालयाने ग्राह्य धरली नाही.

उज्जैनचे रहिवासी दर्पण अवस्थी यांनी ही अपील दाखल केली होती. त्यांच्या याचिकेत श्री महाकालेश्वर मंदिराच्या गर्भगृहात सर्व भाविकांना समान दर्शन व पूजेची संधी मिळावी, असा आग्रह धरण्यात आला होता. मात्र, सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने ही मागणी स्पष्टपणे फेटाळली. खंडपीठात न्यायमूर्ती आर. महादेवन आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांचा समावेश होता. न्यायालयाने निरीक्षण नोंदवताना म्हटले की, "अशा प्रकारच्या याचिका दाखल करणारे लोक खरे भक्त नसतात. मंदिरातील व्यवस्थापन, दर्शन पद्धती किंवा धोरणे ठरवणे हे न्यायालयांचे काम नाही." याचिकाकर्त्यांचे वकील विष्णू जैन यांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने अपील फेटाळून लावली. मात्र, याचिकाकर्त्याला संबंधित सरकारी अधिकाऱ्यांसमोर निवेदन सादर करण्याची मुभा देण्यात आली.

सुनावणीदरम्यान विष्णू जैन यांनी असा युक्तिवाद केला की, गर्भगृहात प्रवेशाबाबत एकसमान धोरण असले पाहिजे. "व्हीआयपी आणि सामान्य भाविकांमध्ये भेदभाव करणे हे भारतीय संविधानाच्या कलम १४ चे उल्लंघन आहे. गर्भगृहात कोणाला प्रवेश द्यायचा, यासाठी समान नियम असणे आवश्यक आहे," असे त्यांनी सांगितले. तसेच, महाकालेश्वर मंदिरात येणाऱ्या प्रत्येक भाविकाला देवतेला जल अर्पण करण्याचा अधिकार असावा, असेही ते म्हणाले. मात्र, या युक्तिवादावर समाधान न व्यक्त करता न्यायालयाने स्पष्ट केले की, मंदिरातील प्रवेश आणि व्यवस्थापनासंबंधी निर्णय घेणे हे न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येत नाही. "जर न्यायालयांनी कोणाला प्रवेश द्यायचा किंवा नाकारायचा हे ठरवायला सुरुवात केली, तर ते न्यायालयांसाठी अतीशय अतिरेकी ठरेल," असे निरीक्षण सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी नोंदवले.

दर्पण अवस्थी यांनी मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या २८ ऑगस्ट २०२५ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयाने यापूर्वीच त्यांची याचिका फेटाळली होती. अवस्थी यांचा दावा होता की, श्री महाकालेश्वर मंदिर प्रशासकीय समिती व्हीआयपी, व्हीव्हीआयपी, राजकारणी किंवा प्रभावशाली व्यक्तींना विशेष सवलती देऊ शकत नाही. याचिकेत असे नमूद करण्यात आले होते की, २०२३ पासून मंदिर समिती व्हीआयपी भाविकांना गर्भगृहात पूजा व विधी करण्याची परवानगी देत आहे, मात्र सामान्य भाविकांना तीच संधी नाकारली जात आहे. हे संविधानाच्या कलम १४ आणि कलम २५ यांचे उल्लंघन असल्याचा दावा करण्यात आला होता. १९८२ अंतर्गत स्थापन झालेल्या मंदिर प्रशासकीय समितीला व्हीआयपींसाठी विशेष तरतुदी करण्याचा कोणताही अधिकार नसल्याचा युक्तिवादही करण्यात आला होता.

---

# गुजरात एटीएसने दहशतवादी कट उधळला

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**अहमदाबाद :** गुजरात एटीएसने नवसारी जिल्ह्यात एका कथित दहशतवादी कटाचा पर्दाफाश करत २२ वर्षीय शिंपी फैजान सलमानी याला अटक केली आहे. लक्ष्यित हत्या घडवून आणणे, 'जिहादी' विचारसरणी पसरवणे तसेच जैश-ए-मोहम्मद आणि अल-कायदाच्या प्रभावाखाली भारताविरुद्ध युद्ध पुकारण्याचा कट रचल्याचा आरोप त्याच्यावर आहे.

विशिष्ट गुप्तचर माहितीनंतर एटीएसने ही कारवाई केली. डीवायएसपी हर्ष उपाध्याय यांना मिळालेल्या माहितीनुसार, उत्तर प्रदेशातील रामपूर जिल्ह्यातील दुंडावाला गावाचा रहिवासी असलेला फैजान सध्या नवसारीतील झरकवाड भागात वास्तव्यास होता आणि तेथूनच कट रचत होता.

गुप्तचर यंत्रणेनुसार, दहशत पसरवण्यासाठी उत्तर प्रदेशातील काही तरुणांच्या लक्ष्यित हत्या करण्याची योजना आखण्यात आली होती. त्याचबरोबर काश्मीरला भारतापासून वेगळे करण्याच्या उद्देशाने 'जिहाद'चा अजेंडा पुढे नेला जात होता. "हा केवळ कट्टर विचारांचा प्रकार नव्हता; त्यामागे प्रत्यक्ष कारवाईचा हेतू होता. शस्त्रांची व्यवस्था, लक्ष्यांची ओळख आणि प्रचार यंत्रणा सक्रिय होती," असे एटीएस अधिकाऱ्यांनी सांगितले. फैजानने चालवलेले संशयास्पद इंस्टाग्राम हँडल 'al. faizangaza' समोर आल्यानंतर तपासाला गती मिळाली. त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली सखोल पडताळणी करून अटक करण्यात आली. पुढील तपास सुरू असून या कटाशी संबंधित आणखी धागेदोरे शोधले जात आहेत.

### 'जन नायकन'ला मोठा धक्का

**चेन्नई :** दाक्षिणात्य सुपरस्टार विजयचा राजकारणात प्रवेश करण्यापूर्वीचा शेवटचा चित्रपट मानला जाणाऱ्या 'जन नायकन'च्या प्रदर्शनाचा मार्ग खडतर झाला आहे. मद्रास उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने या चित्रपटाच्या सेन्सॉर प्रमाणपत्राबाबतचा वाद पुन्हा एकल न्यायमूर्तींकडे फेरविचारासाठी पाठवला आहे. यामुळे चित्रपटाच्या प्रदर्शनाला सध्या तरी स्थगिती मिळाली आहे. 'जन नायकन' हा विजयचा शेवटचा चित्रपट असल्याने याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

---

# राजदने केली पुन्हा मतपत्रिकांची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पाटणा :** गेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव स्वीकारावा लागल्यानंतर राष्ट्रीय जनता दलाने (राजद) निवडणूक प्रक्रियेवर थेट प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. भविष्यातील सर्व निवडणुका ईव्हीएमऐवजी मतपत्रिकेद्वारे घ्याव्यात, यासाठी देशव्यापी मोहीम सुरू करण्याचा निर्णय राजदने घेतला आहे.

पाटणा येथे नुकत्याच पार पडलेल्या राजदच्या राष्ट्रीय कार्यकारी समितीच्या बैठकीत यासंदर्भातील ठराव मंजूर करण्यात आला. या ठरावात 'धनबल' आणि 'सत्ताबल' यांचा गैरवापर करून 'जनबल' म्हणजेच लोकांचा जनादेश प्रभावित करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या बैठकीत तेजस्वी प्रसाद यादव यांची पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी निवड करण्यात आली. कार्यकारी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर तेजस्वी यादव यांनी पक्षाच्या आगामी राजकीय दिशेचे संकेत दिले.

"ईव्हीएमवर सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे मतपत्रिकेद्वारे निवडणुका घेण्याची मागणी जनतेच्या वतीने करणे आवश्यक आहे," असे तेजस्वी यादव यांनी स्पष्ट केले.

---

### 'राजभवन चलो' आंदोलनात काँग्रेसचा मोदी सरकारवर जोरदार हल्ला

# मनरेगावरून कर्नाटक राज्यात रणकंदन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बेंगळुरू:** कर्नाटकच्या राजकारणात ग्रामीण रोजगाराचा मुद्दा अधिकच तापत चालला आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) रद्द करून केंद्र सरकार 'व्हीबी-जी राम जी' योजना लागू करण्याच्या तयारीत असल्याचा आरोप करत काँग्रेसने केंद्र सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवारी बेंगळुरूमध्ये 'राजभवन चलो' आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात मुख्यमंत्री सिद्धरामय्या, उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार आणि काँग्रेसचे सरचिटणीस व कर्नाटक प्रभारी रणदीप सिंह सुरजेवाला सहभागी झाले होते. काँग्रेस नेत्यांनी केंद्रातील मोदी सरकारवर ग्रामीण गरीबांच्या रोजगारावर घाला घालण्याचा आरोप केला. आंदोलनानंतर काँग्रेसचे नेते सरकारी बसमधून लोकभवन (पूर्वीचे राजभवन) येथे गेले आणि राज्यपाल थावरचंद गेहलोत यांना निवेदन सादर केले.

निदर्शनादरम्यान काँग्रेस नेत्यांनी आरोप केला की, केंद्र सरकार ग्रामीण रोजगार हमी व्यवस्थाच उद्ध्वस्त करत असून पंचायतींचे अधिकार पद्धतशीरपणे कमकुवत केले जात आहेत. निदर्शकांना संबोधित करताना मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी 'व्हीबी-जी राम जी' या योजनेवर भाष्य करत म्हटले की, "या योजनेतील 'राम' म्हणजे दशरथ राम किंवा सीता राम नव्हे, तर 'रोजगार आणि उपजीविका अभियानासाठी विकसित भारत हमी (ग्रामीण)' असा त्याचा अर्थ आहे."

सिद्धरामय्या यांनी सांगितले की, यूपीए सरकारच्या काळात आणि पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली लागू करण्यात आलेल्या मनरेगा कायद्याने ग्रामीण भागातील नागरिकांना उपजीविका आणि रोजगाराचा कायदेशीर हक्क दिला. "हा सार्वजनिक हक्क सध्याचे केंद्र सरकार नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहे," असा गंभीर आरोप त्यांनी केला.

ते म्हणाले की, मनरेगामुळे ग्रामीण भागातील अपंगांसह सुमारे पाच कोटी लोकांना रोजगार मिळाला. पूर्वी कोणती कामे घ्यायची याचा निर्णय पंचायती घेत होत्या, मात्र आता केंद्र सरकारच हे ठरवणार असल्याने पंचायतींची भूमिका अत्यंत मर्यादित करण्यात आली आहे.

"पूर्वी प्रत्येक पंचायतला सरासरी एक कोटी रुपयांचा निधी मिळत होता. आता या निधीपासूनही त्यांना वंचित ठेवले जाईल," असेही त्यांनी नमूद केले. त्यांनी म्हटले की, "महात्मा गांधी म्हणाले होते, गावांचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होऊ शकत नाही. मनरेगा रद्द करून भाजपने महात्मा गांधींची दुसऱ्यांदा हत्या केली आहे." त्यांनी राज्यातील प्रत्येक गावात या निर्णयाविरोधात आंदोलन करण्याचे आवाहन केले.

दरम्यान, काँग्रेसचे कर्नाटक प्रभारी रणदीप सिंह सुरजेवाला यांनीही केंद्र सरकारवर आरोपांची झोड उठवली.

उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी भाजपला इशारा देताना म्हटले की, मनरेगा रद्द करून भाजपने स्वतःसाठीच मोठी समस्या निर्माण केली आहे. "ग्रामीण जनता व्हीबी-जी राम जी स्वीकारणार नाही. रोजगार हमी कायदा रद्द केल्याबद्दल भाजपला ग्रामीण भारत कधीही माफ करणार नाही," असे त्यांनी स्पष्ट केले.